(ii) वारा घुमणे - युवक भारला जाऊन, तहानभूक विसरून जाऊन, नवनिर्मितीसाठी प्रयत्नशील होईल.

*प्रश्न ३. खालील प्रतिके व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) वीज रक्तात भिनावी | (अ) सर्वत्र भारत भूमी चमकावी |
| (ii) मातीत माती एक व्हावी | (आ) समाजातील भेदभाव नष्ट व्हावे |
| (iii) नवनिर्माणाची चाहूल लागावी | (इ) मातीने भेदभाव विसरावा |
| (iv) पुसून टाकीत भेदभाव | (ई) माणसांत उत्साह निर्माण व्हावा. |
| (v) उजळावी भूमी दिगंतात | (उ) नवनवीन गोष्टीची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी. |

उत्तरे: (i - ई), (ii - इ), (iii - उ), (iv - आ), (v - अ)

*प्रश्न ४. भावार्थाधारित.

**मातीत माती व्हावी एक... पुसून टाकीत भेदाभेद... या, काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.**

उत्तर: पुन्हा एकदा पावसाच्या सरी बेभान होऊन कोसळाव्यात. या बेभान सरींमुळे मातीत माती मिसळून जावी. ती एकजीव व्हावी. याचाच अर्थ या मातीतील म्हणजे समाजातील सगळा भेदाभेद मिटून जावा. समाजात एकोपा निर्माण व्हावा. म्हणून मातीत माती एक व्हावी असे कवयित्रिला वाटते.

प्रश्न ५. अभिव्यक्ती

(१) **आपल्या देशात शांती निर्माण व्हावी यासाठी 'पुन्हा एकदा' काय व्हावे असे तुम्हांस वाटते ते स्वत:च्या शब्दांत सविस्तर लिहा.**

उत्तर: 'कृती ४ : काव्यसौंदर्य' मधील (३) चे उत्तर पहा.

(२) **कवितेचा तुम्हांला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.**

उत्तर: *(कवितेचा भावार्थ पहा.)*

*(३) **आपल्या देशात शांती निर्माण व्हावी यासाठी 'पुन्हा एकदा' काय व्हावे असे तुम्हांस वाटते ते स्वत:च्या शब्दांत सविस्तर लिहा.**

उत्तर: आपल्या देशात आज भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, स्त्रीशोषण, बालशोषण असे अनेक वाईट प्रकार घडत आहेत. त्यामुळे आपल्या देशात आज अशांतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. यासाठी 'पुन्हा एकदा' क्रांती घडवून आणण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक बनलेले आहे. देशात वाढत चाललेली अराजकता व अंधाधुंदी कमी करण्यासाठी सर्वांनी प्रामाणिकपणाने आपले कर्तव्य निभावले पाहिजे. 'मी भ्रष्टाचार करणार नाही वा इतरांना करू देणार नाही', यावर सर्वांनी ठाम असले पाहिजे. संविधानाच्या विरोधात कार्य करत असलेल्या लोकांना पकडून पोलीस ठाण्यात दिले पाहिजे. देशसेवेचे बाळकडू सर्वांनी प्राशन केले पाहिजे. यासाठी सर्वांनी मिळून पुन्हा एकदा अभियान चालविले पाहिजे.

(४) **नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले लोक सर्वसामान्यांपेक्षा वेगळे असतात, यावर तुमचे विचार सोदाहरण स्पष्ट करा.**

उत्तर: नवनिर्मिती म्हणजे जुन्या चालीरीती, रूढी, परंपरा, समाजात प्रचलित असलेल्या सामाजिक समस्या यांचा नाश करून नवीन मूल्यांवर आधारित समाजाची स्थापना करणे होय. अशा या नवनिर्मितीचा ध्यास घेतलेले लोक इतरांहून वेगळेच असतात. ते आपल्या ध्यासाने भारावलेले असतात. नवनिर्मितीचा ध्यास साकार करण्यासाठी ते समाजात क्रांती घडवून आणतात. आपल्या ज्वलंत विचारांनी व कृतीतून ते समाजापुढे एक आदर्श निर्माण करतात. नवनिर्मितीचा ध्यास घेतलेली माणसे ध्येयवेडी असतात. नेल्सन मंडेला यांनीसुद्धा प्रस्थापित समाजरचनेविरोधात जो संघर्ष केला होता तो खरोखरच प्रशंसनीयच होता. स्वामी विवेकानंद, आगरकर, लोकमान्य टिळक यांनी सुद्धा नवनिर्मितीसाठी भगीरथ प्रयत्न केले होते; म्हणून या सर्वांना सर्वसामान्यांपेक्षा मानाचे व आदराचे स्थान आहे.

**प्रश्न २. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा.**

(१) **कवी / कवयित्रीचे नाव -**
प्रतिमा इंगोले

(२) **कवितेचा विषय-**
नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे वर्णन केले आहे.

(३) **कवितेतील खालील ओळींचा सरळ अर्थ.**

**पुन्हा एकदा चमकावी वीज**
**उतरावी खाली भिनावी रक्तात**
**पेटावे स्नायू करीत पुकार**
**पुन्हा एकवार**

उत्तर: निसर्गातील विविध प्रतीकांचा वापर करीत कवयित्री नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे छान वर्णन करतात. त्या म्हणतात की, पुन्हा एकदा वीज चमकून खाली उतरून यावी. त्या विजेचे तेज, तिची प्रखरता माणसांच्या रक्तात भिनावी. म्हणजेच माणसांमध्ये पुन्हा एकदा उत्साह भरून जावा. त्यांचे स्नायू पेटून उठावेत म्हणजेच समाजातील जुन्या, अनिष्ट चालीरिती, रूढी, परंपरा, अन्याय, अत्याचार याविरुद्ध त्यांनी पेटून उठावे आणि ते सारे नष्ट करून त्यातून समाजाला प्रगतीपथावर घेऊन जाणारे नवीन विचार निर्माण व्हावेत.

(४) **कवितेतून मिळणारा संदेश-**
समाजातील सर्व प्रकारचा भेदाभेद, रूढी, रीतीरिवाज, परंपरा इथल्या तरुणांनी नष्ट कराव्यात. तसेच नवीन, पुरोगामी विचारांचा नवा एकसंघ समाज निर्माण करण्याचा प्रत्येकाने ध्यास घ्यावा. हा संदेश 'पुन्हा एकदा' या कवितेतून मिळतो.

(५) **कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण-**
'पुन्हा एकदा' ही कविता मला खूप आवडली आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे वर्णन करण्यासाठी कवयित्रीने निसर्गातील विविध प्रतिकांचा अतिशय सुरेख वापर केलेला आहे. या प्रतिकांमुळे कविता जिवंत असल्याप्रमाणे भास होतो.

(६) **कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा-**
(१) चाहूल (२) दिगंत (३) चमकणे (४) विज

उत्तर: (१) कानोसा (२) आसमंत (३) चकाकणे (४) सौदामिनी

**पाठाखालील स्वाध्याय**

***प्रश्न १. कवयित्रीला असे का म्हणावेसे वाटते?**

(i) **पावसाच्या सरी कोसळाव्यात, कारण ....**

उत्तर: समाजातील असणारा भेदाभेद मिटून जावा.

(ii) **भुलावी तहान विसरावी भूक, कारण ....**

उत्तर: नवनवीन गोष्टींची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी.

***प्रश्न २. खालील घटनांचे कवयित्रीला अपेक्षित परिणाम लिहा.**

(i) वीज चमकणे - उत्साह निर्माण होतो, माणसात नवचैतन्य सळसळते.

उतरून यावी. त्या वीजेचे तेज, तिची प्रखरता माणसांच्या रक्तात भिनावी. म्हणजेच समाजातील जुन्या चालिरिती परंपरा यांना दूर करणारे प्रभावी विचार माणसांमध्ये भरून जावेत.

*(ii) **मातीत माती व्हावी एक...पुसून टाकीत भेदाभेद....**

उत्तर: बेभान सरींमुळे मातीत माती मिसळून जावी. याचाच अर्थ या मातीतील म्हणजे समाजातील सगळा भेदाभेद मिटून जावा, संपून जावा, असे कवयित्रीला वाटते. म्हणजेच समाजात असलेला गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, जात-धर्म, स्त्री-पुरुष असा विविध प्रकाराचा भेदाभेद नष्ट होऊन भेदभावरहित नव्या समाजाची निर्मिती व्हावी, असे कवयित्रिला वाटते.

(iii) **उजळावी भूमी ... दिगंतात ...**

उत्तर: नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे कवयित्री छान वर्णन करतात. त्या म्हणतात की, नव्या विचारांनी, नव्या कर्तृत्वाने आपली सारी भूमी उजळून निघावी. म्हणजेच आपली भारतभूमी पुन्हा एकदा प्रखर तेजाने तळपावी, तिची कीर्ती सगळ्या जगभर पसरावी, असेच कवयित्रीला वाटते.

(iv) **पुन्हा एकदा, घुमावा वारा, युवक इथला, भारला जावा**

उत्तर: नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे कवयित्रीने छान वर्णन केले आहे. नवनिर्मितीचे विचार प्रखरतेने मांडताना कवयित्री म्हणतात की, पुन्हा एकदा नव्या सुधारणांचा वारा आपल्या समाजात घुमत यावा. या वाऱ्याने म्हणजेच नवीन विचारांनी इथला प्रत्येक युवक भारून जावा.

(२) **क्रांती आपोआप होत नाही तर ती घडवून आणावी लागते, यावर तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.**

उत्तर: क्रांती आपोआप होत नसली तरी ती घडवून आणण्यासाठी तशी परिस्थिती निर्माण व्हावी लागते. क्रांतीमुळे समाजात परिवर्तन होत असते. संपूर्ण समाजात व देशात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य क्रांतीत असते, तिला घडवून आणण्यासाठी समाजातील कोणीतरी व्यक्ती पुढाकार घेते. ती आपले ज्वलंत विचार लिखित स्वरूपात मांडते व पुढे व्यक्त करते. त्याचे वाचन करून लोकांमध्ये तत्कालीन रूढी, परंपरा वा विचारधारणेविषयी तिटकारा निर्माण होतो. जनता आपल्यावर होत असलेला अन्याय, अत्याचार यांविरोधात जागृत होते व क्रांतीस सिद्ध होते. रूसोचे विचार वाचून फ्रेंच लोक राज्यक्रांती करण्यास सिद्ध झाले होते. केसरीतील लोकमान्य टिळकांचे लेख वाचून लोक इंग्रजांविरोधात चिडून उठले होते.

काव्यपंक्ती १ - पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक ४३

पुन्हा एकदा चमकावी ..................................

.................................... दिगंतात ... पुन्हा एकदा....

## कृती ३. कवितेतील शब्दांचा अर्थ.

(१) कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा-

(१) रक्त (२) पुकार (३) पाऊस (४) युवक

उत्तर: (१) रुधिर (२) हाक (३) पर्जन्य (४) तरुण

## कृती ४ :काव्यसौंदर्य

(१) पुढील ओळींचा अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

(i) पुन्हा एकदा चमकावी वीज उतरावी खाली, भिनावी रक्तात

उत्तर: निसर्गातील विविध प्रतिकांचा वापर करीत कवयित्री नवनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे छान वर्णन करतात. त्या म्हणतात की, पुन्हा एकदा वीज चमकून खाली